# University of Mumbai

संलग्नता विभाग

तात्काळ/हस्ते बटवडा/ऑनलाईन

क्र. संलग्नता/आयसीई/२०१८-१९/२७

दि. ३० /०७/२०१८

## परिपत्रक

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता **संलग्नीकरणाबाबतचे** सर्व प्रस्ताव / अर्ज ऑनलाईन सादर करणेबाबत.

संदर्भ :- १.परिपत्रक क्र. संलग्नता / आयसीसी/२०१६-१७/२३, दि. ३० डिसेंबर, २०१६

२. परिपत्रक क्र. संलग्नता/ आयसीसी/२०१६-१७/३१ दि. २ मार्च, २०१७

विद्यापीठ सलग संलग्नीत / कायम संलग्नीत / स्वायत्त (Continuation / Permanent /Autonomous) असलेल्या सर्व महाविद्यालये / संस्था यांचे प्राचार्य / संचालक यांना विनिर्दीष्टीत परिपत्रकानुसार सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठीचे सलग संलग्नीकरणाचे / नैसर्गीक वाढीचे / कायम संलग्नीकरणाचे प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रस्ताव ऑनलाईन सादर करण्याकरिता खालील सूचनांचे पालन करावे.

सूचना :-

१) विद्यापीठाचे https://muonline.org.in या संकेत स्थळावर संबधित प्रस्तावांचे विभाग (Section) मध्ये (उदा. Activate Link of Continuation of affiliation Proposal-2019-20) लिंक देण्यात आलेल्या आहेत. या लिंक द्वारे महाविद्यालये आपल्याला आवश्यक त्या अर्जाच्या लिंक सुरु ( Activate) करू शकतील.

२) आवश्यक त्या अर्जाची लिंक प्राप्त झाल्यानंतर अर्जाच्या सुरुवातीला संलग्नीकरणासंबधीत मागणी करीत असलेल्या अभ्यासक्रम / तुकडी इत्यादीचा तपशील ऑनलाईन अपडेट करावा.

३) पूर्वीचे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीताचे सलग संलग्नीकरणाचे (Continuation of Affiliation) प्रस्ताव महाविद्यालयाने ऑनलाईन विद्यापीठास पाठविले असतील अशा महाविद्यालयांची माहिती शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीताच्या प्रस्तावामध्ये दिसुन येईल.

४) आवश्यकतेनुसार अभ्यासक्रम / विषय काळजी पूर्वक तपासुन घ्यावे. महाविद्यालयास नको असणारे अभ्यासक्रम / विषय महाविद्यालय वगळू शकतात किंवा आवश्यक असल्यास नविन अभ्यासक्रम / विषय नमूद करू शकतात.

५) आपण ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या अभ्यासक्रम / तुकड्यांनुसार आपल्याला संलग्नीकरण शुल्क भरणा करण्याकरिताची लिंक निर्धारित शुल्कासह उपलब्ध होईल. परंतु निर्धारित शुल्क भरण्या करिताची सुविधा फक्त एकदाच उपलब्ध असेल,म्हणून निर्धारित शुल्क / अभ्यासक्रम / तुकड्या / विषय यांची खातरजमा प्राचार्यांनी / संचालकांनी केल्यानंतरच ऑनलाईन पद्धतीने संलग्नीकरण शुल्क भरावे. तदनंतरच सदर अर्ज / प्रस्ताव ऑनलाईन विद्यापीठास सादर झाला असे समजण्यात येईल.

६) ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर अर्जाची एक प्रत (Hard Copy) संलग्नता विभागात ऑगस्ट महिन्याच्या अखेरच्या दिवशी (सायंकाळी ४ :०० वा. पर्यंत) सादर करण्यात यावी.

७) ऑनलाईन अर्ज सादर करण्याबाबतच्या विस्तृत सूचना https://muonline.org.in या संकेत स्थळावरील Proposal Guidelines for Current Academic Year या लिंक द्वारे उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.

८) उपरोक्त उल्लेखित ऑनलाईन पद्धतीने जे अर्ज प्राप्त होणार नाहीत अशा अर्जासंबधि महाविद्यालयामार्फत / संस्थेमार्फत करण्यात आलेल्या कोणत्याही पत्र व्यवहाराचा विचार विद्यापीठाकडून केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

(टीप :- ज्या महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीताचा सलग **संलग्नीकरणाचा** (Continuation of Affiliation) / नैसर्गिक वाढीचा अर्ज / प्रस्ताव केलेला नसेल अशा महाविद्यालयांकरीता शैक्षणिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० या दोन्ही वर्षाचे अर्ज व विहित विलंब शुल्क सादर करण्याची सुविधा उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी Help Line No. 0772206528, 07722065284 वर संपर्क साधावा)

(डॉ. दिनेश कांबळे )
कुलसचिव (प्र)
मुंबई विद्यापीठ

प्रति :

१) प्राचार्य / संचालक, विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये / संस्था.

२) संचालक, मे. निर्मल सॉफ्टवेअर सर्व्हीसेस प्रा. लि., यांना संदर्भीय क्र. २ नुसार पुढील कार्यवाहीस्तव.